**विषय- :- मुंबई विभागातील अप्पर मुद्रांक नियंत्रक,मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाची पुर्नरचना व कामकाजाचे फेर वाटप करण्याबाबत...**

**संदर्भ** :- १) शासन निर्णय क्र आस्थापना २००४/४०१३/प्र.क्र६८७/म-१ दिनांक ३०/१२/२००५
२) शासन निर्णय क्र.आस्थापना-२००६/प्र.क्र. २५१/म-१, दि.२२/०८/२००६
३) शासन निर्णय क्र.आस्थापना-२००८/प्र.क्र.३३६/म-१, दि.२१/०५/२००९
४) मा. नोदणी महानिरिक्षक यांनी दिलेले दि.२८/०८/२०१२ रोजीचे निर्देश.

---

क्र.का.५/मुद्रांक-२०१२/प्र.क्र.-१२/८७०/२०१२
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
दिनांक - ०१/०९/२०१२.

## आदेश

ज्याअर्थी शासन आदेश शासन निर्णय क्र.आस्थापना-२००६/प्र.क्र. २५१/म-१. दि.२२/०८/२००६ अन्वये मुद्रांक अधिक्षक ( मुख्यालय ) यांना मुबंई मुद्रांक अधिनियम १९५८ चे अनुसुचि-१ चे अनुच्छेद २५ (da) खालील कंपन्या व बॅकाचे एकत्रिकरण अथवा विभक्त करणाचे दस्तऐवज हाताळण्यासाठी मुद्रांक जिल्हाधिकारी म्हणून घोषित करण्यात आले होते,

आणि ज्याअर्थी मुद्रांक अधिक्षक (मुख्यालय) ही कामे हाताळीत होते,

आणि ज्याअर्थी शासन निर्णय क्र.आस्थापना-२००८/प्र.क्र.३३६/म-१, दि.२१/०५/२००९ अन्वये मुद्रांक अधिक्षक ( मुख्यालय ) हे अतिरिक्त जिल्हाधिकारी संवर्गातील पद पुणे येथील नोंदणी महानिरीक्षक कार्यालयामध्ये वर्ग करण्यात आले आहे व त्या बदल्यात नोंदणी महानिरीक्षक कार्यालयातील कार्यासन क्रमांक-१३ हे निम्नश्रेणी वर्ग-१ संर्वगातील पद प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई येथे वर्ग करण्यात आले आहे,

आणि ज्याअर्थी उक्त शासन निर्णयाने मुद्रांक अधिक्षक ( मुख्यालय ) हे पद या कार्यालयात वर्ग करण्यात आल्याने सदर पदाची सर्व कामे अप्पर मुद्रांक नियंत्रक यांनी करावीत आणि प्रधान मुद्रांक कार्यालयात वर्ग केलेल्या कार्यासन अधिकारी -१३ या पदावरील अधिका-याने अप्पर मुद्रांक नियंत्रक यांच्या कामामध्ये सहाय्य करावे असे स्पष्ट करण्यात आले आहे,

आणि ज्याअर्थी अप्पर मुद्रांक नियंत्रक यांना अद्यापी मुद्रांक जिल्हाधिकारी घोषीत केले नसल्याने अनु. २५ (da) खालील कंपन्या व बॅकाचे एकत्रिकरण अथवा विभक्त करणाचे दस्तऐवजाच्या बाबतीत बरेच काम प्रधान मुद्रांक कार्यालयात प्रलंबित आहे.त्यामध्ये शासनाचा ब-याच मोठ्या प्रमाणात महसूल अडकलेला आहे तसेच संबंधित पक्षकारांची गैरसोय देखील होत आहे,

आणि ज्याअर्थी मुद्रांक जिल्हाधिकारी (अंमलबजावणी -१ व २) यांना या पूर्वीच शासन अधिसूचना महसूल व वन विभाग क्रमांक आस्थापना २००४ / ४०१३/ प्र.क्र-६८७/म-१ दिनांक ०६/०२/२००६ अन्वये मुद्रांक जिल्हाधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले असल्याने याबाबतीत निम्नस्वाक्षरीकार व शासनाचे उपसचिव (मदतकार्य व पुर्नवसन ) यांचेत झालेल्या चर्चे दरम्यान सदरच्या कामकाजाचे निपटा-यासाठी वरील कामकाज हे मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी -१ व २ यांना सोपविण्यात यावेत असे ठरले आहे,

त्या अर्थी निम्नस्वाक्षरीकार हे प्रशासकिय नियंत्रक अधिकारी या नात्याने यापुढे

**" मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी-१ व २ यांनी कंपन्या व बॅका एकत्रिकरण व विभक्ती संबंधित दस्ताच्या अभिनिर्णयाची कामे करावीत " असे आदेश देत आहेत.**

**सही/-XXX**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक व**
**मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रति -

१) अप्पर मुद्रांक नियंत्रक मुंबई यांना पुढील योग्यत्या कार्यवाहीसाठी
२) मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी -१ व २

प्रत- १) सर्व नोंदणी उपमहानिरिक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांना माहीतीस्तव
२) सर्व कार्यासन अधिकारी नोंदणी महानिरिक्षक कार्यालय पुणे यांना माहीतीस्तव.
३)सर्व सह जिल्हानिबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांना माहीतीस्तव.

निर्गमित,

**सह नोंदणी महानिरीक्षक व**
**मुद्रांक अधिक्षक (मुख्यालय), म.रा. पुणे.**